# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करण्याची चौकट)
विनियम, २०१०

एप्रिल, २०१०

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करण्याची चौकट) विनियम, २०१०


१. संक्षिप्त शीर्षक, लागू करणे, प्रारंभ आणि अर्थनिश्चिती..................................३
२. व्याख्या ३
३. मूलभूत तत्त्वे ५
४. डीएसएम मार्गदर्शक तत्त्वे ६
५. डीएसएम कार्यक्रमांसाठी पात्रतेचे निकष ८
६. डीएसएम पोर्टफोलिओ विकास आणि सादर करणे ८
७. डीएसएम सल्लागार समितीची भूमिका ९
८. डीएसएम कार्यक्रम नियोजन आणि कार्यान्वयन संबंधित वितरण परवानाधारकाच्या जबाबदाऱ्या ११
९. डीएसएमसाठी निधी उभारणे, लक्ष्यांक आणि अर्थसंकल्प १२
१०. डीएसएम कार्यक्रम, पोर्टफोलिओ आणि वार्षिक कामाचा आराखडा आणि त्याच्या मंजूरीची प्रक्रिया १६
११. मुल्यांकन, मापन आणि पडताळणी (इएमॲण्डव्ही) १९
१२. सनियंत्रण आणि अहवाल सादर करणे. २०
१३. डीएसएम कार्यक्रम पूर्ण झाल्याचा पूर्णता अहवाल २०
१४. निवडीचे निकषः डीएसएम आराखड्यात समाविष्ट करावयाच्या डीएसएम कार्यक्रमांच्या निवडीची पद्धत २१
१५. आराखड्यामध्ये समाविष्ट करावयाच्या इतर कार्यक्रमांसाठी निवडीचे निकष २२
१६. अडचणी दूर करण्याचे अधिकार २२
१७. आदेश आणि आदेशिका निर्गमित करणे २२
१८. सुधारणा करण्याचे अधिकार २२
जोडपत्र-१ : डीएसएम कार्यान्वित करताना करावयाच्या कृतींची यादी २३
जोडपत्र-२ : डीएसएम आराखडा दस्तऐवजाचे भाग २४
जोडपत्र ३ः डीएसएम कार्यक्रमाच्या दस्तऐवजाचे भाग २७

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करण्याची चौकट) विनियम, २०१०

### विद्युत अधिनियम २००३

क्र. मविनिआ/लिगल/१११/२०१०/१८०.विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १८१ चे उप-कलम (१) आणि कलम १८१ च्या उप-कलम (२)च्या खंड (झेडपी ) ने प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे, वितरण परवानाधारकांनी वीज मागणी व्यवस्थापकारिता अनुसरावयाची कार्यान्वयीन चौकट आणि त्यासंबधित व त्यास आनुषंगिक व सहाय्यभूत बाबींकरिता खालीलप्रमाणे विनियम करीत आहे:-

### १. संक्षिप्त शीर्षक, लागू करणे, प्रारंभ आणि अर्थनिश्चिती

१.१ या विनियमांना, "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करण्याची चौकट) विनियम, २०१०", असे म्हणावे.

१.२ हे विनियम सबंध महाराष्ट्र राज्यास लागू राहतील.

१.३ हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

१.४ या विनियमांचा अर्थ, वेळोवेळी सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम २००५, मधील तरतुदींशी सुसंगतपणे लावण्यात येईल.

२. **व्याख्या**

२.१ संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर, या विनियमांमध्ये :

(ए) **"अधिनियम"** म्हणजे वेळोवेळी सुधारणा केलेला विद्युत अधिनियम २००३ (२००३ चा ३६);

(बी) **"टाळलेले खर्च"** म्हणजे वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रम कार्यान्वित करताना वितरण परवानाधारकाने वीज खरेदी करण्यसाठी टाळलेला किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या/नवीन वितरण यंत्रणेची श्रेणीवाढ करण्यासाठी करावी लागणारी गुंतवणूक पुढे ढकलल्यामुळे किंवा टाळल्यामुळे न करावा लागणारा वाढीव खर्च;

(सी ) **"खर्चाची परिणामकारकता"** म्हणजे वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमांतील कोणत्याही गुंतवणूकीची सापेक्ष कामगिरी किंवा आर्थिक आकर्षकतेचा निर्देशक किंवा अशी गुंतवणूक केलेली नसताना निर्मिती केलेल्या आणि पुरवठा केलेल्या विजेवरील खर्चाशी , आणि "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यववस्थापनाच्या परिमापन आणि कार्यक्रमाच्या खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण) विनियम, २०१० मध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे, केलेली तुलना;

(डी) **"वीज मागणी एक स्त्रोत"** म्हणजे डीएसएम कार्यक्रम कार्यान्वित केल्यामुळे वीज वापरात (युनिट) आणि / किंवा मागणीत होणारी बचत, जिला तीन महत्वाचे अंग असतील: परिमाण- किती उपलब्ध आहे (युनिट आणि किंवा विद्युत भारामध्ये); कालावधी- केव्हा उपलब्ध आहे (दिवसाच्या कोणत्या वेळी, कोण-कोणत्या दिवशी, कोणत्या हंगामात); आणि खर्च- त्यासाठी किती खर्च होईल;

(ई) **"वितरण परवानाधारक"** यास अधिनियमात दिलेला अर्थ असेल;

(एफ) **"डीएसएम"** म्हणजे वीज मागणी व्यवस्थापन;

(जी) **"डीएसएम सल्लागार समिती"** म्हणजे या विनियमांच्या विनियम ७ खाली सविस्तरपणे दिलेली डीएसएम कार्यक्रम मंजूर करण्याची प्रक्रिया आयोगास सुलभ व्हावी यासाठी स्थापन केलेली समिती. या समितीचा आमंत्रक आयोगाचा सचिव असेल;

(एच) **"कार्यक्षम ऊर्जा"** म्हणजे ग्राहकाला अपेक्षित असलेला वीज पुरवठ्याच्या सेवेचा दर्जा कायम ठेवत असतानाच, ज्यामुळे ग्राहकाचा वीज वापर कमी केला जातो अशा अधिक कार्यक्षम साधनांत किंवा नियंत्रणांमध्ये गुंतवणूक करण्यास ग्राहकांना उद्युक्त करतील अशी कार्ये किंवा कार्यक्रम;

(आय) **"मुल्यांकन, मापन आणि पडताळणी (इएमव्ही)"** म्हणजे डीएसएम किंवा ऊर्जा कार्यक्षम कार्यक्रम किंवा त्यांची बाजारपेठेतील सद्यस्थिती यांचे मूल्यांकन, संनियंत्रण, मापन आणि पडताळणी करणारी कार्ये;

(जे) **" उपयोगिता कालावधी "** म्हणजे या कार्यक्रमाखाली सूरू केलेले डीएसएम उपाय- जे अद्याप चालू आहेत आणि जे पुढे चालू राहू शकतील अशा वर्षांची अंदाजित संख्या;

(के) **"विद्युत भार व्यवस्थापन"** म्हणजे ज्यामुळे ज्यास्त निर्मिती खर्च असणा-या कालावधीतील सर्वोच्च मागणी कमी करण्यात येते किंवा ती सर्वोच्च मागणी नसलेल्या किंवा कमी निर्मिती खर्च असलेल्या कालावधीकडे वळविण्यात येते असे कार्यक्रम;

(एल) **"विद्युत भार संशोधन"** म्हणजे विद्युत उद्योगाखाली सेवा घेत असलेल्या ग्राहकांकडून सर्वसाधारणपणे वापरण्यात येत असलेल्या विद्युत भाराची वैशिष्ट्ये आणि कलाची पूर्ण व खात्रीदायक माहिती पूरविण्यासाठी लागणाऱ्या विद्युत भाराच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास आणि मापन समाविष्ट असणारे कार्य;

२.२ येथे वापरलेल्या आणि व्याख्या न केलेल्या शब्द व उक्तींना अधिनियम किंवा त्याखाली केलेल्या नियम किंवा विनियमामध्ये नमूद केल्यानुसार अर्थ राहील.

## ३ मूलभूत तत्त्वे

३.१ प्रत्येक वितरण परवानाधारक हा त्याच्या दैनंदिन कामकाजाचा डीएसएम हा एक अविभाज्य भाग करेल आणि योग्य डीएसएम कार्यक्रम दीर्घकालीन तत्त्वावर चालू ठेवण्यासाठी त्याचे नियोजन, रचना आणि कार्यान्वयन हाती घेईल.

३.२ वितरण परवानाधारक डीएसएम कार्याशी संबंधीत- नियोजन, रचना, कार्यान्वयन, संनियंत्रण, आणि मूल्यांकन याबाबींसह- झालेल्या सर्व समर्थनीय खर्चाचा समावेश वार्षिक महसूली गरजेत करुन त्याची वसूली वीज दराच्या माध्यमातून करेल ज्यामुळे त्यांना निधी उभा करणे शक्य होईल किंवा ग्राहकाच्या जागेवर हे कार्यक्रम कार्यान्वित करेल ज्यामुळे ग्राहकाला त्यांनी केलेल्या गुंतवणूकीवर योग्य परतावा मिळेल.वितरण परवानाधारकांने डीएसएमशी संबंधित हाती घेतलेली सर्व कार्ये /कार्यक्रम -

(एक) वितरण परवानाधारकांचे ग्राहक आणि स्वत: वितरण परवानाधारकांना देखील खर्चाच्या दृष्टीने परिणामकारक असतील;

(दोन) ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणारे असतील आणि ते समन्याय रितीने कार्यान्वित करण्यात येतील;

(तीन) त्यांच्या परिणामस्वरुप परवानाधारकांच्या सर्व ग्राहकांच्या एकूण वीज दरात कपात होईल;

३.३ वितरण परवानाधारक खालील बाबींसाठी या विनियमांचे मार्गदर्शन घेईल-

(एक) वीज दर निश्चित करण्यासाठी आयोगाकडे करावयाच्या अर्जाचा एक भाग म्हणून दीर्घ-कालीन वीज खरेदी करण्यासाठी सादर करावयाच्या योजनेचे नियोजन करताना;

(दोन) विद्युत भार व्यवस्थापन, ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा कार्यक्षमता कार्यान्वित करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या उपाय-योजना आयोगाला सादर करताना;

(तीन) खर्च-लाभाच्या विश्लेषणासह ऊर्जा आणि मागणीवरील परिणाम आयोगाला सादर करताना;

३.४ खर्चाची परिणामकारकता तपासताना वितरण परवानाधारक, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यवस्थापनची उपाययोजना आणि कार्यक्रमावरील खर्च परिणामकारकतेचे मुल्यांकन) विनियम २०१० पासून मार्गदर्शन घेईल.

## ४. डीएसएम मार्गदर्शक तत्त्वे

वितरण परवानाधारकाची खालील कर्तव्ये राहतील:-

(ए) वितरण परवानाधारक ज्या कार्यक्रमामुळे दीर्घ-कालीन विजेची बचत होईल असे लगेच कार्यान्वित होणारे डीएसएम कार्यक्रम राबवेल.

(बी) वाणिज्यिक, सार्वजनिक क्षेत्र, निवासी, नगरपालिका, औद्योगिक आणि कृषी वापराच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जागांवर विजेची बचत होईल असे कार्यक्रम वितरण परवानाधारक तयार करेल आणि कार्यान्वित करेल;

(सी) वितरण परवानाधारक सर्वोच्च मागणी आणि आनुषंगिक महागड्या विजेची खरेदी कमी करण्यास मदत होईल असे कार्यक्रम, विशेषत: नागरी भागात, कार्यान्वित करेल. अशा कार्यक्रमामध्ये, वीज मागणीला प्रतिसाद देण्यासाठी घेतलेले पुढाकार, ज्यामध्ये ग्राहक परवानाधारकाशी केलेल्या कराराद्वारे त्यांच्या विद्युत भाराची मागणीची फेर-आखणी करण्यास मान्य करतील, असतील.

(डी) वितरण परवानाधारक जे डीएसएम कार्यक्रम राबविल्यामुळे होणारे लाभ (बाजार पेठेतील बदल) दीर्घकाल टिकतील असे कार्यक्रम तयार करेल, आणि ज्यामुळे विशेषत:-

एक) ग्राहकांचे स्वारस्य वाढेल आणि ते विद्युत भाराचे व्यवस्थापन आणि ऊर्जा कार्यक्षमतेचे कार्यक्रम स्वीकारण्यासाठी म्हणजेच ग्राहकांना त्यांच्या मनातील काल्पनिक बांध काढून टाकून ऊर्जा कार्यक्षमतेचे कार्यक्रम हाती घेण्यास उद्युक्त करतील;

दोन) ऊर्जा कार्यक्षमतेच्या उपाय योजना कार्यान्वित करण्यासाठी कर्ज देण्यासाठी बँकांसारख्या मध्यस्थांचे स्वारस्य वाढवतील; आणि

तीन) विजेचा पुरवठा करण्यासाठी टिकून राहना-या कंपन्यांची स्थापना/ विकसित करण्यासाठी चालना मिळेल.

(ई) वितरण परवानाधारक असे कार्यक्रम कार्यान्वित करेल जे :

(एक) सर्व स्त्रोतांसाठी कमी खर्चीक असतील;

(दोन) डीएसएम कार्यक्रमात भाग न घेणाऱ्या ग्राहकांवर तसेच या कार्यक्रमात भाग घेणाऱ्या ग्राहकांवर अवाजवी बोजा टाकीत नाहीत;

(तीन) कार्यक्रम सर्व वर्गवारीतील ग्राहकांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या लाभ करुन देतील.

(एफ) राष्ट्रीय पातळीवरील प्रयत्नांना, विशेषतः ब्युरो ऑफ एनर्जी इफिशिअन्सी (बीईई) ने सुरु केलेल्या कार्यक्रमांना पूरक ठरतील. असे डीएसएमचे कार्यक्रम वितरण परवानाधारक आखेल, विकसित आणि कार्यान्वित करेल.

(जी) वितरण परवानाधारकांच्या डीएसएम कार्यक्रमांची रचना, ही निवडलेल्या डीएसएम कार्यक्रमांसंबंधी "बाजारपेठतील अधिष्ठित" दृष्टीकोनावर आधारलेली असेल.

(एच) हितसंबंधितांशी सलामसलत करुन डीएसएम कार्यक्रमांचा विकास, रचना आणि अमंलबजावणी करण्यात येईल ज्यामुळे या कार्यक्रमाची अमंलबजावणी फलदायी ठरेल आणि ग्राहक जागृतीची आणि प्रशिक्षणाची देखील खात्री मिळेल.

ग

(आय) या विनियमांखाली स्थापन करण्यात आलेली डीएसएम सल्लागार समिती ही या विनियमांखाली कार्यक्रमांच्या अमंलबजावणीला गती देणारी एक नोडल एजन्सी असेल, आणि ती डीएसएम कार्यक्रमांची आयोगाकडे मंजूरीसाठी शिफारस करेल.

## ५. डीएसएम कार्यक्रमांसाठी पात्रतेचे निकष

जर एखादा डीएसएम कार्यक्रम, या विनियमांमधील विनियम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या डीएसएम बाबतच्या मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करीत असेल, तर असा डीएसएम कार्यक्रम आयोगाच्या मते पात्र राहील.

## ६. डीएसएम पोर्टफोलिओ विकास आणि सादर करणे

(एक) वितरण परवानाधारक विद्युत भार संशोधनाच्या कार्यावर आधारित डीएसएम आराखडे आणि त्याचे निष्कर्ष आयोगाला सादर करेल आणि त्याच्या परिणामस्वरुप डीएसएम कार्यक्रम कार्यान्वित करण्याबाबतचे प्रस्ताव एकत्रितपणे 'डीएसएम आराखडे' म्हणून समजण्यात येतील.

(दोन) वितरण परवानाधारक डीएसएमसाठी लक्ष्यांक विनिर्दिष्ट करेल आणि बहु-वर्षीय नियोजनावर आधारीत डीएसएम आराखडा सादर करेल.

(तीन) डीएसएम आराखड्याचा कालावधी हा बहुवर्षीय वीज दराच्या कालावधी इतका असेल.

(चार) वितरण परवानाधारक बहु-वर्षीय वीज दराचा प्रस्ताव सादर करताना त्याबरोबरच बहुवर्षीय डीएसएम आराखडा सादर करेल.

परंतु असे की, बहु-वर्षीय वीज दराचा प्रस्ताव सादर करेपर्यंत, वितरण परवानाधारक डीएसएम आराखडे एक वर्षाच्या लक्ष्यांकासह सादर करेल आणि जेव्हा बहु-वर्षीय वीज दराचा प्रस्ताव सादर करण्यात येईल तेव्हा या लक्ष्यांकाचे बहुवर्षीय आराखड्यात समायोजन करेल.

(पाच) डीएसएम आराखड्यामध्ये प्रत्येक डीएसएम कार्यक्रमाचे अग्रक्रम आणि अमंलबजावणीचे वेळापत्रक असेल, ज्याच्या आधारे एकत्रित निधीच्या गरजेचे वर्ष-निहाय वेळापत्रक तयार करण्यात येईल, आणि सर्वोच्च्य वीज भाराच्या कालावधीची वेळ बदलण्यास/ कमी करण्या संबंधी बचतीच्या संदर्भात करावयाची साध्ये ठरविण्यात येतील.

(सहा) एकत्रित निधीची वर्ष-निहाय गरज आणि प्रस्तावित साध्ये यांचा अनुक्रमे वार्षिक डीएसएम अर्थसंकल्प आणि वार्षिक लक्ष्यांक म्हणून वापर करण्यात येईल.

(सात) बहु-वर्षीय नियोजन चक्राच्या सुरुवातीला, प्रत्येक कार्यक्रमाच्या आणि पोर्टफोलियोच्या खर्चाच्या परिणमकरकतेवर आधारीत, डीएसएम आराखड्याला आयोग मंजूरी देईल.

## ७. डीएसएम सल्लागार समितीची भूमिका

(१) डीएसएम सल्लागार समितीची स्थापना आयोगाकडून करण्यात येईल. या समितीत खालील सदस्य असतील:-

ए) आयोगाचा सचिव आमंत्रक असेल.
बी) महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक वितरण परवानाधारकाचा एक प्रतिनिधि;
सी ) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) चा आणि ब्युरो ऑफ एनर्जी इफिशिअन्सीचा एक प्रतिनिधि;
डी) शैक्षणिक आणि संशोधन संस्थांचे प्रतिनिधी
ई) अधिनियमाच्या कलम ९४ खाली प्राधिकृत करण्यात आलेले कायम स्वरुपी ग्राहक प्रतिनिधी;
एफ ) आयोगाच्या सचिवाच्या मते, विद्युत क्षेत्राचे विशेष ज्ञान किंवा अनुभव ज्यांना आहे असे सचिवाने, उद्योग आणि शासकीय विभागातील नामनिर्देशित केलेले अन्य स्वतंत्र बाह्य सदस्य.

(२) डीएसएम सल्लागार समितीची उद्दिष्टे व कार्ये खालीलप्रमाणे असतील:-

ए) डीएसएम कार्यक्रम आणि डीएसएम आराखड्याचे मूल्यांकन करण्यात आयोगाला मदत करणे;

बी) वीज वापराच्या तंत्रज्ञानासंबंधी, वापराचा कल, किंमत अदा करण्याची इच्छा, यापूर्वी कार्यान्वित केलेल्या डीएसएम कार्यक्रमांच्या ग्रहणक्षमतेचा अभ्यास आणि परिणाम याबाबत माहिती गोळा करण्यासाठी कायम स्वरुपी विद्युत भार संशोधन हाती घेण्याचा वितरण परवानाधारकाला सल्ला देणे.

सी ) योग्य डीएसएम कार्यक्रम आणि आराखडा यांची रचना करण्यासाठी वितरण परवानाधारक आणि अन्य हितसंबंधितांना आप-आपासात शिकण्यास चालना देणे,

डी) खालील बाबींशी संबंधीत थेट संशोधन आणि विश्लेषण काम हाती घेणेः-

(एक) माहिती संग्रह विकसित करणे आणि मध्यवर्ती माहिती व्यवस्था विकसित करणे,

(दोन) डीएसएम कार्यक्रम सुलभपणे कार्यान्वित करण्यासाठी मार्गदर्शक सूत्रे/ विनियम विकसित करणे;

(तीन) डीएसएम आणि संभाव्य वीज मागणीच्या प्रतिसादाचा अभ्यास करणे;

(चार) डीएसएमला चालना देण्यासाठी वीज दरात नाविन्यपूर्ण देकार विकसित करणे.

ई) वितरण परवानाधारकांनी सादर केलेला डीएसएम कार्यक्रम, पोर्टफोलिओ आणि डीएसएम आराखड्यांचा आढावा घेणे.

एफ) वितरण परवानाधारकांमधील सामायिक कार्यक्रमांचा (सामायिक वीज खरेदी, साधनसामुग्री/ तंत्रज्ञानासाठी सामायिक तपशिलवार वैशिष्ट्ये) आढावा घेणे.

जी) डीएसएम आराखडा तयार करणे आणि डीएसएम कार्यक्रमाची रचना करण्याशी संबंधीत असलेल्या वितरण परवानाधारकांच्या कार्यांचे पर्यवेक्षण करणे;

एच) वितरण परवानाधारकांतर्गत प्रशिक्षण/क्षमता वाढविण्याचे, संधी निर्माण करणे;

आय) मध्यवर्ती माहिती यंत्रणा आणि माहिती-संग्रह यांची देखभाल करण्यात सहाय्य करणेः

जे) डीएसएम कार्यक्रम आणि आराखडांची रचना करण्यासाठी वितरण परवानाधारकांना उपयोगी पडतील असे बाजारपेठ संशोधन आणि ग्राहक सर्वेक्षण हाती घेणे;

के) डीएसएम आराखडा/ कार्यक्रम संनियंत्रण आणि मुल्यांकन, मापन आणि पडताळणी करण्यास आवश्यक असेल तेव्हा आयोगाला सहाय्य करणे;

एल) खालील बाबींसाठी व्यासपीठ म्हणून काम करणेः-

(एक) संपूर्ण डीएसएम कार्यान्वयन चक्रासंबंधातील- ज्यात परवानाधारकाच्या कर्मचाऱ्यांकरिता ज्ञान संग्रह तयार करणे, डीएसएम आराखडा तयार करणे, विद्युत भार संशोधन, स्त्रोतांचे एकात्मिक नियोजन, डीएसएम कार्यक्रमाची रचना, कार्यान्वयन, संनियंत्रण, आढावा आणि मुल्यांकन यांचा समावेश असेल- अनुभव इतरांना सांगणे;

(दोन) आयोग आणि तज्ञ व्यक्तींमधील वैचारिक देवाण घेवाण आणि समन्वय राखणे;

(तीन) डीएसएम तंत्रज्ञानाच्या विकासासंबंधातील अनुभव इतरांना सांगणे;

(चार) अर्थ पुरवठादार आणि बँका यांच्यात संपर्क ठेवणे;

(पाच) जनजागृती मोहिम, जनजागृतीची कार्ये इत्यादींचा संयुक्तपणे विकास करणे/ चालवणे, ईसी/ईई केंद्रे स्थापन करणे व चालवणे, ग्राहकांमधील परस्पर संर्पकासाठी सभा, प्रदर्शने संयुक्तपणे आयोजित करणे इ.;

(सहा) पूर्व प्रकरणांचा अभ्यास, सल्लागार/ विक्रेतांची यादी आणि तंत्रज्ञानविषयक माहिती-संग्रह विकसित करणे.

## ८. डीएसएमचे नियोजन आणि कार्यान्वयन संबंधित वितरण परवानाधारकाच्या जबाबदाऱ्या

(एक) डीएसएमशी संबंधित असणारी सर्व कार्ये कार्यान्वित करण्यासाठी वितरण परवानाधारक सुसाध्य व्यूहरचना तयार करेल;

(दोन) डीएसएम समन्वय समितीने परस्पर संर्पक साधण्यासाठी वितरण परवानाधारक एक नोडल अधिकारी नामनिर्देशित करेल.

(तीन) डीएसएम समन्वय समितीने प्रयत्नांची शिकस्त करुन चालना दिलेल्या कार्यांशिवाय, वितरण परवानाधारक खालील विशिष्ट कार्ये पार पाडेलः-

ए) विद्युत भार संशोधन आणि ग्राहक सर्वेक्षण;

बी) स्त्रोतांचे एकात्मिक नियोजन ज्यामध्ये विजेच्या नियोजनात डीएसएम हे एक महत्त्वाचे स्त्रोत असेल;

सी) विद्युत भाराबाबतचे अंदाज आणि किमान वीज वापराचा विकास करणे

डी) प्रशिक्षणाद्वारे त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या क्षमतेचा विकास करणे;

ई) डीएमएम आराखडा तयार करणे;

एफ) डीएसएम कार्यक्रमाची रचना करणे;

जी) वार्षिक अर्थसंकल्प आणि वार्षिक कामाचा आराखडा तयार करणे आणि आयोगाकडे मंजूरीसाठी सादर करणे;

एच) आयोगाने मान्यता दिलेले डीएसएम आराखडे आणि कार्यक्रम कार्यान्वित करणे;

आय) आयोगाने आदेशाद्वारे अधिसूचित केलेल्या बाबींसंबंधी वार्षिक माहिती आणि कार्यान्वित केलेल्या कार्यक्रमांची त्रैमासिक माहिती सादर करणे;

जे ) डीएसएम कार्यक्रम पातळीवरील वादांचे निराकरण करणारी यंत्रणा स्थापन करणे आणि कोणताही वाद असल्यास त्याचे निराकरण करणे.

के) डीएसएम आराखडा आणि कार्यक्रमाच्या पातळीवरील आयोगाने आदेशाद्वारे आधिसूचित केल्यानुसार मूल्यांकन, मापन आणि पडताळणी करणे;

एल) खालील बाबींची माहिती पुरविणे:

(एक) मध्यवर्ती माहिती व्यवस्था / माहिती संग्रह विकासाचे काम;
(दोन) संशोधन आणि विश्लेषणाचे काम;
(तीन) डीएसएम आणि संभाव्य वीज मागणीच्या प्रतिसादाचा अभ्यास;
(चार) विद्युत भाराच्या अंदाजासाठी मॉडेल विकसित करण्याचे प्रयत्न करणे;

एम) डीएसएम समन्वय समितीने सुचविलेले किंवा आयोगाने निर्देश दिल्या प्रमाणे कोणतीही अन्य सकार्ये.

## ९. डीएसएमसाठी निधी उभा करणे

९.१ विनियम ३.२ मधील सर्वसाधारणतेला बाधा न येऊ देता, खालील तरतूदी लागू राहतील :-

ए) वितरण परवानाधारकांनी कार्यान्वित करावयाच्या सर्व डीएसएम कार्यक्रम व आराखडे यासाठी लागणाऱ्या निधीचा समावेश वार्षिक महसूली गरजेत (एआरआर) करण्यात येईल;

बी) वितरण परवानाधारकाला त्याने कोणत्याही डीएसएम संबंधीत कामावर झालेल्या खर्चाची वसूली, या खर्चाचा समावेश एआरआर मध्ये करुन वीज दराच्या माध्यमातून करता येईल. डीएसएम संबंधित कामात नियोजन, विद्युत भार संशोधन आयोजित करणे, डीएसएम कार्यक्रमाची रचना, कार्यान्वयन, संनियंत्रण आणि मूल्यांकन करणे या बाबी समाविष्ट असतील.

सी) डीएसएमसंबंधित खर्चाची वसूली वीज दराच्या माध्यमातून करण्यात येत असल्यामुळे, डीएसएम संबधित जी कार्ये, खर्चाच्या परिणामकारकतेच्या निर्धारणा संबंधित असलेल्या विनियमांचे पालन करतात, अशीच कार्ये वितरण परवानाधारकांकडून कार्यान्वित करण्यात येतील;

डी) डीएसएमसाठी निधी उभा करण्याकरीता अन्य पूरक मार्ग जसे, सार्वजनिक लाभ आकारांच्या माध्यमातून सर्वांसाठी एकत्रित निधि, लाभदायक असल्याचे आढळून आले तर, आयोग असा मार्ग अनुसरण्यास, वितरण परवानाधारकाला निर्देश देऊ शकेल;

ई) डीएसएम कार्यक्रम ग्राहकांच्या जागेत भागीदारीत कार्यान्वित करण्यासाठी वितरण परवानाधारक आयोगाची पूर्व-मंजूरी घेईल; परंतु असे की, अशा कार्यक्रम गुंतवणुक, त्यावर परतावा मिळण्यास पात्र राहतील आणि एआरआर मंजूरीच्या प्रक्रियेत त्यांचे मुल्यांकन करण्यात येईल.

९.२ डीएसएम अर्थसंकल्प

(ए) विनियम ६ मधील सर्वसाधारणतेला बाधा न येऊ देता, खालील तरतूदी लागू राहतील:-

(एक) वितरण परवानाधारक डीएसएम आराखडा आणि डीएसएम कार्यक्रमाचा अर्थसंकल्प तयार करेल आणि बहु-वर्षीय वीज दर आणि वार्षिक महसूली गरजेच्या मंजूरीच्या प्रक्रियेच्या वेळी सादर करेल;

(दोन) डीएसएम सल्लागार समितीकडून एकत्रित डीएसएम आराखड्यास आणि/ किंवा प्रत्येक डीएसएम कार्यक्रमाला मंजूरी मिळाल्यानंतरच अर्थसंकल्पानुसार रकमा खर्च करण्यात येतील;

(तीन) परवाना क्षेत्रात राबविण्याची शक्यता असलेल्या कार्यक्रमांचा अग्रक्रमाच्या आधारे कार्यान्वित करावयाचे डीएसएम आराखडे आणि संलग्न अर्थसंकल्प निश्चित करण्यात येतील;

(चार) डीएसएम सल्लागार समितीने स्वतःहून, राज्यातील ग्राहकांना लाभ व्हावा म्हणुन निर्देश दिल्याप्रमाणे सविस्तर विद्युत भार संशोधन करुन आणि डीएसएम कार्यक्रम राबवून, विजेच्या युनिट्स आणि भारात करावयाच्या बचतीचे लक्ष्यांक ठरविण्यात येतात. आणि या लक्ष्यांकानुसार डीएसएम अर्थसंकल्पातील खर्च झाला आहे किंवा नाही याचा दर वर्षी आढावा घेण्यात येईल;
बचत करण्यासंबंधातील डीएसएम आराखड्याची अंमलबजावणी आणि

(बी) सर्वोच्च भार मागणीचा कालावधी बदलण्यासाठी/ कमी करण्यासाठी किंवा अर्थसंकल्पातील त्याबाबतच्य नियत रकमा यांच्या वर्ष-निहाय अनुसूची वितरण परवानाधारक सादर करतील.

(सी ) एकत्रित निधीची वर्ष-निहाय गरज आणि साध्ये अनुक्रमे वार्षिक डीएसएम अर्थसंकल्प आणि वार्षिक डीएसएम लक्ष्यांक, हे राहतील.

(डी) नियोजन चक्राच्या सुरुवातीला निश्चित केलेल्या व मंजूरी दिलेल्या या डीएसएम अर्थसंकल्प आणि लक्ष्यांकाचा आढावा, वार्षिक कामगिरीच्या आढाव्याच्या वेळी घेण्यात येईल.

(ई) वातावरणातील बदलासंबंधीच्या युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शनच्या अंतर्गत असलेल्या किंवा ऐच्छिक कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठीच्या

निधीच्या कार्यपध्दतीचा वापर करुन योजलेल्या उपाय-योजनांचा विशेष आढावा डीएसएम सल्लागार समिती घेऊ शकेल.

९.३ डीएसएम आराखडा कार्यान्वित करण्या व्यतिरिक्त अन्य डीएसएम कार्यांसाठीचा निधी

वितरण परवानाधारक (डीएसएम कार्यक्रम आणि डीएसएम आराखडा कार्यान्वित करण्या व्यतिरिक्त झालेल्या) अतिरिक्त खर्चाकरीता वेगळा अर्थसंकल्प मंजूरीसाठी सादर करेल. या अर्थसंकल्पात, विद्युत भार संशोधन, ग्राहक सर्वेक्षण, डीएसएम आराखडा व कार्यक्रमांचा विकास करण्याची कार्ये, संशोधन आणि विश्लेषण, डीएसएम समन्वय समितीने प्रस्तावित केलेल्या कोणत्याही कार्यासाठी निधी उभारणे, संभाव्य अभ्यास, प्रशिक्षण आणि विकास आयोजित करणे, इ. बाबी ससमाविष्ट असतील.

९.४ ग्राहक जनजागृती, वीज वापराचे परिक्षण आणि समन्यायी कार्यांसाठी निधी उपलब्ध करुन देणे.

वितरण परवानाधारकाला, खालील स्वरुपाच्या कार्यक्रमांना चालना देण्यासाठी डीएसएम समन्वय समिती आणि आयोगाच्या पूर्व-संमतीने वाजवी रकमा खर्च करता येतील

(एक) डीएसएम कार्यक्रम जे :

(ए) विद्युत भार व्यवस्थापन/ऊर्जेची कार्यक्षमता यासंबंधी का, कसे, केव्हा आणि कोठे या सारख्या प्रश्नांसंबंधी जन-जागृती आणि प्रशिक्षणास चालना देतात आणि या कार्यक्रमात खालील कार्यांचा समावेश असतोः

- एक ऊर्जेचे लेखा परीक्षण
- दोन जन-जागृती मोहिम
- तीन ऊर्जा कार्यक्षमता (ईई) आणि भार व्यवस्थापनाचे (एलएम) प्रात्यक्षिक प्रकल्प
- चार प्रशिक्षण कार्यक्रम, परिसंवाद, कार्यशाळा, परिषदा, खरेदीदार-विक्रेता यांच्या भेटी

पाच कायम स्वरुपी प्रदर्शन/ प्रात्यक्षिक केंद्रे-नि-''हरित'' मॉडेल/ अति ऊर्जा कार्यक्षम इमारती (ज्या इमारती एनर्जी कॉन्झर्वेशन बिल्डिंग कोड (ईसीबीसी) पेक्षा जास्त कार्यक्षम आहेत)

ब) दारिद्रयरेषेखालील ग्राहक/ दर महिन्यास १०० युनिट्सपेक्षा कमी वापर करणाऱ्या ग्राहकांकरीता (ज्यांचा कमी उत्पन्न गटातील ग्राहक म्हणून विचार करण्यात येतो) डीएसएम कार्यक्रम.

## १०. डीएसएम कार्यक्रम, पोर्टफोलिओ आणि वार्षिक कामाचा आराखडा आणि त्याच्या मंजूरीची प्रक्रिया

(एक) जोडपत्र-१ मधील महत्त्वाचे दस्तऐवज डीएसएम समन्वय समिती आणि / किंवा आयोगाकडे मंजूरीसाठी सादर करताना वितरण परवानाधारक वर उल्लेखलेल्या बाबी अनूसरेल.

(दोन) वरील दस्तऐवजांना मंजुरी देण्याची प्रक्रिया बहु-वर्षीय वीज दराला मंजूरी देताना त्याबरोबरच सुरु होईल.

(तीन) दरम्यांनच्या अंतरिम कालावधीत, सर्व पथदर्शक आणि नियमित कार्यक्रमांना या विनियमात उल्लेखलेल्या प्रक्रियेद्वारे, डीएसएम समन्वय समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे, आयोग मंजूरी देईल.

(चार) डीएसएम आराखडा दस्तऐवज

राज्यातील वितरण परवानाधारक बहु-वर्षीय डीएसएम आराखडा तयार करुन तो आयोगाकडे मंजुरीसाठी सादर करतील आणि या संदर्भात डीएसएम आराखड्यात समाविष्ट असणे आवश्यक असलेल्या सर्वसाधारण बाबी आणि या विनियमातील जोडपत्र-२ हे त्यांचे मार्गदर्शक राहतील.

१०.१ डीएसएम आराखडाच्या मंजुरीची प्रक्रिया

डीएसएम आराखड्याला आयोगाने मंजूरी देताना खालील बाबी मार्गदर्शक राहतील:

(एक) या आराखड्याची मुदत पंच-वार्षिक बहु-वर्षीय वीज दराच्या मुदती सारखी राहील.

(दोन) डीएसएम आराखडा आयोगाकडे कमीत कमी नऊ महिने आधी किंवा वितरण परवानाधारकाने सादर करावयाच्या व्यवसाय आराखड्याच्या बरोबर सादर करण्यात येईल.

(तीन) वितरण परवानाधारक हा आराखडा छापील (सहा प्रती) आणि त्याचबरोबर त्याची संगणकीय (सॉफ्ट) प्रत देखील सादर करेल.

(चार) डीएसएम समन्वय समिती कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी सभा घेईल आणि वितरण परवानाधारकाकडून आवश्यक असलेली माहिती घेईल.

(पाच) कोणतेही विशिष्ट निरिक्षण आणि आवश्यक असलेल्या दुरुस्तीबाबत वितरण परवानाधारकाला कळविण्यात येईल. त्यानंतर, परवानाधारक आयोगाकडून/ डीएसएम समन्वय समितीकडून आलेल्या पत्रातील सर्व अभिप्राय विचारात घेऊन सुधारित डीएसएम आराखडा, आयोगाकडून/ डीएसएम समन्वय समितीकडून आलेल्या पत्रातील विनिर्दिष्टीत मुदतीत आयोगाला सादर करेल.

(सहा) व्यवसाय आराखड्यातील इतर भागांबरोबर डीएसएम आराखड्याचा आढावा आयोग घेईल.

१०.२ डीएसएम कार्यक्रम दस्तऐवज

(एक) डीएसएम आराखड्याला मंजूरी मिळाल्यानंतर, डीएसएम आराखड्यात मंजूरी देण्यात आलेल्या सर्व डीएसएम कार्यक्रमांकरीता वितरण परवानाधारक, ''डीएसएम कार्यक्रम दस्तऐवज'' (पीडी) तयार करेल.

(दोन) जोडपत्र-३ मध्ये देण्यात आलेल्या तपशीलांसार सर्वसाधारण भाग डीएसएम कार्यक्रम दस्तऐवजामध्ये समाविष्ट करणे आवश्यक राहील. हे डीएसएम कार्यक्रम दस्तऐवज, आराखड्यात समाविष्ट असलेल्या सर्व डीएसएम कार्यक्रमाचे कार्यान्वयन, सनियंत्रण, आढावा इ. बाबत, मार्गदर्शक राहील.

१०.३ डीएसएम वार्षिक कामाचा आराखडा

(एक) डीएसएम आराखड्यास एकदा मंजूरी मिळाल्यानंतर, वितरण परवानाधारक पहिल्या वर्षातील कामाचा आराखडा तयार करेल आणि या आराखड्याचा समावेश परवानाधारकाच्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्यासंबंधीच्या याचिकेत करेल.

(दोन) या वार्षिक कामाच्या आराखड्यात पहिल्या वषाचे अंदाजपत्रक प्रतिबिंबीत होणे आवश्यक आहे.

(तीन) वार्षिक कामाच्या आराखड्यात प्रतिबिंबीत झालेले अंदाजपत्रक हे पुढील वर्षाच्या वार्षिक महसूली गरजेत समाविष्ट करण्यात येईल. प्रथेनुसार वार्षिक महसूलाची गरज ही वार्षिक कामगिरीच्या आढाव्याच्या याचिकेबरोबर सादर करण्यात येते.

(चार) डीएसएम वार्षिक कामाच्या आराखड्यात खालील बाबींचा समावेश असेल :-

(ए) प्रत्येक कार्यक्रम-निहाय आणि (आराखड्याच्या पातळीवरील) कार्यक्रम पोर्टफोलिओ निहाय (बचत, ग्राहकांनी सहभागी होण्याचे प्रमाण, व्यवसायातील भागीदाराचा सहभाग इ.च्या संदर्भात) त्या वर्षात साध्य करावयाची उद्दिष्टे.

(बी) (प्रत्येक कार्यक्रम-निहाय आणि कार्यक्रम पोर्टफोलिओ निहाय/ आराखडा पातळीवरील) साध्य केलेली आणि करावयाची कार्ये, त्यासंबंधीच्या वेळापत्रकासह.

(सी ) आवश्यक असलेल्या स्त्रोतांची अनुसूची (अंदाजपत्रक, मनुष्यबळ, पायाभुत सोयी-सुविधा, संस्था)

(डी ) डीएसएम कार्यक्रम कार्यान्वित करण्यात विविध हितसंबंधितांच्या जबादाऱ्यांचा आणि वितरण परवानाधारकाने डीएसएम संबंधात केलेल्या प्रयत्नांचा तपशील.

(इ) मान्यताप्राप्त कार्यक्रम आणि अंदाजपत्रकात करावयाचे कोणतेही समायोजन आणि दुरुस्ती, असल्यास; अशा समायोजन आणि दुरुस्तीचा योग्य तपशील त्याबाबतच्या समर्थनासह;

(पाच) राज्यातील वितरण परवानाधारक, पुढील वर्षासाठी देखील, वार्षिक डीएसएम कामाच्या आराखड्याए दस्तऐवज दर वर्षी तयार करेल आणि त्याचा समावेश त्या वर्षाच्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्याच्या याचिकेत करेल.

(सहा) जोपर्यंत राज्यात बहु-वर्षीय वीज दर ठरविण्याची प्रक्रिया अमंलात येत नाही तोपर्यंत, वितरण परवानाधारकांकडून सादर करण्यात आलेल्या पथदर्शक कार्यक्रमांचा आणि सर्व मंजू-यांना, मंजूरी देण्याची प्रक्रिया डीएसएम समन्वय समितीकडून सुरु करण्यात येईल.

१०.४ डीएसएम आराखडा, कार्यक्रम, वार्षिक कामगिरीच्या आराखड्याचे दस्तऐवज संकेत स्थळावर प्रदर्शित करणे

डीएसएम आराखडा दस्तऐवजास, प्रत्येक डीएसएम कार्यक्रम दस्तऐवज तसेच वार्षिक कामाचा आराखडा दस्तऐवज, यांना एकदा मंजुरी मिळाल्यानंतर, वितरण परवानाधारक हे दस्तऐवज त्यांच्या संकेत स्थळांवर प्रदर्शित करतील ज्यामुळे डीएसएम कामासंबंधात करण्यात येत असलेले नियोजन, नियोजित/अपेक्षित परिणामांच्या तुलनेत वीज संवर्धनातील योगदान इ.बाबतच्या माहितीचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होऊ शकेल.

## ११. मुल्यांकन, मापन आणि पडताळणी (इएमॲण्डव्ही)

(एक) मविनिआ (मुल्यांकन, मापन आणि पडताळणी) विनियम हे वितरण परवानाधारकांसाठी मार्गदर्शक राहतील.

(दोन) वर कोणताही उल्लेख करण्यात आला असला तरी, मविनिआ (मुल्यांकन, मापन आणि पडताळणी) विनियम अंमलात येईपर्यंत, वितरण परवानाधारकांकडून कार्यान्वित करण्यात येत असलेल्य डीएसएम कार्यक्रमांचे मूल्यांकन, प्रत्येक कार्यक्रमांत किंवा एकत्रित आराखड्यात सादर करण्यात आलेल्या आणि डीएसएम समन्वय समितीने वैध ठरविलेल्या मापन आणि पडताळणी कार्यपध्दतीच्या आधारे, करण्यात येईल.

(तीन) आयोग, मुल्यांकन, मापन आणि पडताळणी आराखडे कार्यान्वित करण्यासाठी स्वतंत्र पडताळणी कंत्राटदारांची यादी तयार करेल.

(चार) वितरण परवानाधारक मुल्यांकन, मापन आणि पडताळणी आराखडे कार्यान्वित करण्यासाठी यादीतील स्वतंत्र पडताळणी कंत्राटदारांची नेमणूक करेल.

(पाच) प्रत्येक कार्यक्रम किंवा संपूर्ण आराखड्यासाठी, मुल्यांकन, मापन आणि पडताळणी आराखडे कार्यान्वित करण्यासाठी यादीतील कंत्राटदारांची थेट नेमणूक करण्याबाबत आयोग विचार करु शकेल.

## १२. सनियंत्रण आणि अहवाल सादर करणे

(एक) वितरण परवानाधारक डीएसएम बाबत मासिक, त्रैमासिक आणि वार्षिक संनियंत्रण आराखडे आयोगास सादर करतील.

(दोन) मूल्यांकन करण्याच्या पध्दतीचे नियमन मविन्आि (मूल्यांकन, मापन आणि पडताळणी) विनियमांद्वारे करण्यात येईल.

(तीन) वर काहीही उल्लेख करण्यात असले तरी, मविन्आि (मूल्यांकन, मापन आणि पडताळणी) विनियम अंमलात येईपर्यंत, वितरण परवानाधारक, कार्यक्रमांत/आराखड्याच्या रचनेत समाविष्ट असलेल्या प्रस्तावित संनियंत्रण आराखड्यावर आधारित, सर्व पथदर्शक-स्तरावरील आणि मोठ्या प्रमाणावरील डीएसएम कार्यक्रमांकरिता मासिक आणि त्रैमासिक संनियंत्रण अहवाल आयोगाला सादर करेल.

## १३. डीएसएम कार्यक्रम पूर्ण झाल्याचा पूर्णता अहवाल

(एक) कार्यक्रम पूर्ण झाल्यावर, वितरण परवानाधारक सविस्तर कार्यक्रम पूर्णता अहवाल तयार करेल आणि तो कार्यक्रम पूर्ण झाल्यापासून एक महिन्याच्या आत आयोगाला सादर करेल.

(दोन) या पूर्णता अहवालात कार्यक्रमावर प्रत्यक्ष खर्च किती झाला या संबंधीच्या माहितीशिवाय, कार्यक्रमात साध्य झालेली उद्दिष्टे, निष्पत्ती; परिणामांच्या संदर्भात, कार्यक्रमात आल्या असल्यास मर्यादा/अडचणी; निष्कर्ष,

शिफारशी, मिळालेले अनुभव; नियामक पाठिंब्याची गरज, आवश्यकता असल्यास; आणि भविष्यात करावयाची अभिप्रेत कार्यवाही, या बाबींचाही समावेश असेल.

(तीन) डीएसएम आराखड्याचा कालावधी पूर्ण झाल्यावर देखील वरील प्रमाणेच एक पूर्णता अहवाल वितरण परवानाधारकाकडून तयार करण्यात येईल.

**१४. निवडीचे निकषः डीएसएम आराखड्यात समाविष्ट करावयाची डीएसएम कार्यक्रमांच्या निवडीची पद्धत**

(एक) मविनिआ (वीज मागणी व्यवस्थापनाच्या मापन आणि कार्यक्रमाच्या खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण) विनियम, २०१० मध्ये नमूद केलेल्या खर्च परिणामकारकता चाचण्यांशिवाय, अधिक पसंतीच्या पोर्टफोलिओंची निवड व्हावी यासाठी निवड प्रक्रियेत खाली नमूद केलेले अतिरिक्त मापदंड वापरावे लागतील.

(ए) सर्वोच्च विद्युत भारात कपात (पीक क्लिपींग) आणि/किंवा सर्वोच्च विद्युत भाराच्या कालावधीत बदल करण्याची क्षमता - सर्वोच्च मागणी नसलेल्या कालावधीत विजेची बचत करु शकणाऱ्या डीएसएम कार्यक्रमांऐवजी सर्वोच्च मागणी असलेल्या कालावधीत बचत करु शकणाऱ्या डीएसएम कार्यक्रमांना आयोग अधिक पसंत करु शकेल. तसेच, सर्वोच्च मागणी असलेल्या कालावधीत बचत करु शकणाऱ्या कार्यक्रमामध्ये देखील, ज्या कार्यक्रमांद्वारे सर्वोच्च विद्युत भारात उच्चतम कपात करु शकणाऱ्या किंवा सर्वोच्च भाराच्या कालावधीत बदल करण्याची क्षमता असणाऱ्या डीएसएम कार्यक्रमांना आयोग, इतर बाबी सारख्याच राहिल्यास, अधिक पसंत करु शकेल.

(बी) कार्यक्षम ऊर्जेचा नवीन स्टॉक - ज्या डीएसएम कार्यक्रमांमध्ये कार्यक्षम ऊर्जेच्या नवीन स्टॉकला चालना मिळते, विशेषतः ज्या कार्यक्रमांमध्ये दीर्घकाल उपयुक्त राहू शकणा-या कार्यक्षम ऊर्जेच्या नवीन स्टॉकला चालना मिळते, अशा कार्यक्रमांना आयोग अधिक पसंत कय्रु शकेल.

सी ) किती कालावधीसाठी विजेची बचत उपलब्ध असेल - ज्या डीएसएम कार्यक्रमांत विजेची बचत दीर्घ कालावधीसाठी होते अशा कार्यक्रमांना आयोग अधिक पसंत करु शकेल.

(डी) हरित वायू (कार्बन डाय ऑक्साइड) कमी करण्याची क्षमता - ज्या डीएसएम कार्यक्रमांच्या उपयोगिता कालावधीमध्ये विजेची जास्त बचत होते अशा कार्यक्रमांला आयोग अधिक पसंत करु शकेल.

## १५. आराखड्यामध्ये समाविष्ट करावयाच्या इतर कार्यक्रमांसाठी निवडीचे निकष

या आराखड्यात समाविष्ट कार्यक्रमांच्या निवडीचे खालील घटकांद्वारे नियमन करण्यात येईलः

(एक) अधिनियमाखालील धोरणाच्या उद्दिष्टांच्या व मार्गदर्शक तत्त्वांच्या पूर्ततासाठी कार्यक्रमाद्वारे होणारे योगदान.

(दोन) अडचणी दूर करण्याची आणि वीज ग्राहकांच्या ऊर्जेच्या कार्यक्षमतेच्या मुल्य निर्धारणात किंवा दृष्टीकोनात किंवा ज्ञानात आणि ऊर्जा कार्यक्षमतेच्या प्रथा/उपकरणे/साधने स्वीकारण्याबाबत, सकारात्मक टिकाऊ बदल घडवून आणण्याची कार्यक्रमाची क्षमता.

(तीन) कार्यक्रम रचनेचा दर्जा आणि वर्धनक्षमता, उद्दिष्टांची स्पष्टता. उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्वीकारलेल्या व्यूहरचनेची एकंदर योग्यता; निष्पत्ती, उद्दिष्ट्ये, व्यूहरचना, उत्पादन, कार्ये आणि माहिती व अंदाजपत्रकांचा वाजवीपणा यांची आपापसातील मजबूत तार्किक जोडणी.

## १६. अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमातील कोणत्याही तरतूदी अमंलात आणताना जर कोणतीही अडचण उद्भवली तर आयोग सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, अधिनियमाशी विसंगत नसेल अशी आणि आयोगाच्या मते अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनासाठी जी कार्यवाही करणे आवश्यक किंवा इष्ट असेल, अशी योग्य कार्यवाही आयोग करेल.

## १७. आदेश आणि कार्य-प्रणाली निदेश

अधिनियमातील तरतूदींना अधीन राहून, या विनियमांच्या अंमलबजावणी करण्यासाठी, आयोग वेळोवेळी आदेश, परिपत्रके आणि कार्य-प्रणाली निदेश निर्गमित करु शकेल.

## १८. सुधारणा करण्याचे अधिकार

आयोग कोणत्याही वेळी या विनियमांतील कोणत्याही तरतूदीमध्ये बदल, फेरफार, अल्प बदल, सुधारणा करु शकेल.

## जोडपत्र-१ : डीएसएम कार्यान्वित करताना करावयाच्या कृतींची यादी

<u>आयोगाने करावयाची कामे -</u>

- डीएसएमच्या नियोजन, रचना आणि प्रशासनासाठी मार्गदर्शक सूचना आणि विनियम विकसित करुन निर्गमित करणे

<u>वितरण परवानाधारकाने करावयाची कामे -</u>

- विद्युत भार संशोधन आणि ग्राहक सर्वेक्षण करणे
- एकूण यंत्रणेच्या पातळीवर, भाग पातळीवर आणि ग्राहक पातळीवर विद्युत भाराचे अंदाज करणे
- एकात्मिक स्रोत नियोजनाच्या कामाच्या संबंधांसह डीएसएम आणि ऊर्जा संवर्धन क्षमता अभ्यास आयोजित करणे
- अल्प आणि दीर्घकालीन डीएसएम लक्ष्ये (म्हणजे युनिट,मेगावॅट ) ठरविणे
- डीएसएम कार्यक्रम, पोर्टफोलिओ, आणि आराखडा तयार करणे, दस्तऐवज तयार करणे, नित्याच्या संनियंत्रण व नियामक बाबींचा अहवाल सादर करणे
- डीएसएम कार्यक्रम, पोर्टफोलिओ, आराखड्याकरिता वार्षिक कामाचा आराखडा तयार करणे
- वार्षिक डीएसएम अंदाजपत्रक तयार करणे
- डीएसएम कार्यक्रम पातळीवरील वादाचे निराकरण करणे
- डीएसएम नियोजन, कार्यक्रमांची रचना, खर्चाची गृहिते, मूल्यांकन, मापन, पडताळणी यांना सहाय्य करण्यासाठी डीएसएमशी संबंधित केंद्रीकृत माहिती प्रणाली आणि माहिती-संग्रह विकसित करणे.
    - डीएसएम कार्यक्रम, खर्च, साध्ये, मिळालेले अनुभव यांची सूची तयार करणे
    - डीएसएमच्या उपाय-योजना निहाय मानीव बचत, खर्च आणि वेळ यांचे अंदाज करणे
    - टाळलेले खर्च - वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण
- डीएसएम आराखड्यास सहाय्य करण्यासाठी संशोधन व विश्लेषण करणे
- राज्यातील डीएसएम कार्यांना पाठिंबा देण्यासाठी आयोगाने महत्वाच्या मानलेल्या अन्य कोणत्याही बाबी

## जोडपत्र-२ : डीएसएम आराखडा दस्तऐवजाचे पूरक भाग

वितरण परवानाधारकांने आयोगाकडे मंजूरीसाठी सादर करावयाच्या डीएसएम आराखडा दस्तऐवजामध्ये खालील सर्वसाधारण भागांचा समावेश करणे आवश्यक राहीलः-

१. **कार्यकारी गोषवाराः** येथे आराखड्याचा संक्षिप्त आढावा देण्यात येईल व त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल - आराक्ड्याच्या कालावधीसाठी डीएसएमचे लक्ष्य; आराखड्याच्या कालावधीसाठी अभिप्रेत असलेला एकूण अर्थपुरवठा व त्याची कार्यक्रमासाठी लागणारा निधी आणि परवानाधारकांला डीएसएमच्या प्रशासन आणि व्यवस्थापनासाठी लागणारा निधी, अशी केलेली विभागणी; आयोगाने ठरवून दिलेल्या लक्ष्यांच्या पूर्ततेसाठी, कार्यान्वयनाकरिता प्रस्तावित केलेल्या डीएसएम कार्यक्रमांची यादी व थोडक्यात वर्णन; आराखडा पातळीवरील आणि प्रत्येक कार्यक्रम पातळीवरील खर्चाची परिणामकारकता ज्यात ग्राहक वीज दरावर परिणाम; आयोगाच्या धोरणातील महत्त्वाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी आराखड्याचे गुणात्मक आणि/किंवा संख्यात्मक योगदान, यांचाही समावेश असेल; साध्य केलेल्या लक्ष्यांची आणि लागणा-या निधीची वर्ष-निहाय विभागणी; महत्त्वाची गृहिते आणि जोखीम

२. **पार्श्वभूमी :** येथे मागील बहु-वर्षीय आराखड्यातील कोणत्या बाबी साध्य केल्या, यासंबंधी चर्चा करावी व त्यात पुढील बाबींचा समावेश करावा - कोणती लक्ष्ये ठरविण्यात आली होती, ती किती प्रमाणात साध्य करण्यात आली होती/आहेत/करण्याची शक्यता आहे आणि जर लक्ष्ये साध्य करण्यात आली नसतील तर त्याबाबतची कारणे आणि खुलासा; राखून ठेवलेल्या निधीचा किती प्रमाणात आणि परिणामकारकतेने वापर झालेला आहे; विविध कार्यक्रम कार्यान्वित करताना कोणते महत्त्वाचे निर्बंध आले व मिळालेले अअनुभ.

३. **वितरण परवानाधारकांच्या यंत्रणेची वैशिष्ट्ये :** येथे मागील २ ते ५ वर्षातील वेळेच्या मालिकेनुसार माहिती नमूद करावी. या माहितीमध्ये - वीज पुरवठ्याबाबत सर्वसाधारण परिस्थितीची माहिती - किती मागणी पुरवली, भार नियमन- असल्यास; परवानाधारकाच्या ग्राहकांची संख्या - ग्राहकांची एकूण संख्या, वीज दरातील वर्गवारीतीनुसार ग्राहक; विजेचा एकूण वापर आणि त्याची ग्राहक आणि वीज दरानुसार वर्गवारी- निहाय विभागणी; स्रोत-निहाय वीज खरेदी आणि वीज खरेदीचा सरासरी दर; विद्युत भाराचा कालमर्यादा सापेक्ष

चढउतार, हंगामातील सर्वोच्च भार, दैनंदिन विशिष्ट सरासरी; हंगामी आणि साप्ताहिक विद्युत भारातील चढउतार; पुढील पाच वर्षातील (आराखड्याचा कालावधी) वीज मागणी, विजेची गरज, विक्री, महसूलाची गरज यांचे अंदाज, ज्यामध्ये पुढील बाबींचा तपशील असेल- वापरण्यात आलेली पद्धत, वापरण्यात आलेली माहिती, वापरलेल्या मूळ गृहितांचे आणि गृहितांच्या आधारांचे विवरणपत्र, केलेले सूक्ष्म विश्लेषण आणि गृहितांतील बदल आणि सूक्ष्म विश्लेषण करण्यासाठी गृहित धरलेल्या इतर शर्ती-  या बाबी स्पष्ट करण्यात आलेल्या असतील.

४. **डीएसएम आराखड्यातील लक्ष्य आणि स्त्रोत उपलब्धतेचे अंदाजः** डीएसएमसाठी प्रस्तावित लक्ष्यांची आणि लक्ष्यांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असलेल्या स्त्रोतांची गरज, याबाबत येथे चर्चा करावी.

५. **लक्ष्यांची पूर्तता करण्यासाठी क्षेत्र, विभाग आणि विजेचा वापर निश्चित करणेः** येथे ठरविलेल्या लक्ष्यांची पूर्तता करण्यासाठी कोणत्या क्षेत्रांची, (घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, कृषी, नगरपालिका), विभागांची (ग्राहक वर्गवारी जशी- कार्यालये, इस्पितळे, हॉटेल्स, मॉल्स, बँका, औद्योगिक समूह-एमआयडीसीच्या औद्योगिक वसाहती, भौगोलिक क्षेत्र, रस्त्यावरील दिवाबत्ती, ग्रामपंचायतीच्या पाणी पुरवठा यंत्रणा, विशिष्ट फीडर्स् इ.) आणि विजेचा वापर (प्रकाश, पंप चालवण्यासाठी, वातानुकूलनाकरिता इ.) यापैकी लक्ष्ये साध्य करण्यासाठी कोणत्या  क्षेत्र/विभाग/विजेचा वापर, आपण निवड करणार आहात व केलेल्या निवडीचे समर्थन नमूद करावे.

६. **डीएसएमचची लक्ष्ये साध्य करण्यासाठी डीएसएम उपाय-योजना/ तंत्रज्ञानाचे पर्याय/ कार्यक्रम/पोर्टफोलिओ/आराखडे निश्चित करणे :** येथे, लक्ष्ये साध्य करण्यासाठी (निवड केलेले क्षेत्र, विभाग, आणि वीज वापराच्या अंतर्गत) डीएसएम उपाय योजना/आणि तंत्रज्ञानाची निवड करण्यासाठी आपण वापरलेल्या प्रक्रियेची (समर्थनासह) चर्चा करावी. येथे, ज्या डीएसएम उपाय योजना आणि तंत्रज्ञानाचा विचार करण्यात आला परंतु शेवटी जी नाकारण्यात आली त्यांच्या नाकारण्यामागील कारणे, छाननीसाठी वापरण्यात आलेले निकष, असल्यास, वापरलेली गृहिते, असल्यास, गृहितांचा आधार इ. बाबत देखील चर्चा करावी.

७. **प्रत्येक कार्यक्रमाचा तपशील:** डीएसएम कार्यक्रमांच्या निश्चित केलेल्या अंतिम पोर्ट-फोलियोत समाविष्ट केलेल्या प्रत्येक डीएसएम कार्यक्रमाकरीता, जोडपत्र ३ मध्ये नमूद केलेली माहिती द्यावी.

८. **वार्षिक व संचित साध्ये:** येथे, (आराखड्यातील संचित लक्ष्ये साध्य होतील याची खात्री करण्यासाठी) निश्चित केलेल्या अंतिम पोर्ट-फोलियो मधील विविध कार्यक्रमांद्वारे मिळणारे वार्षिक योगदान, दाखवावे.

९. **वितरण परवानाधारकाकडून डीएसएम कार्यान्वित करण्यासाठी प्रशासन व व्यवस्थापन:** येथे बहु-वर्षीय आराखड्याच्या कालावधीत, कर्मचा-यांची क्षमता वाढविणे, विद्युत भार संशोधन व संभाव्य ऊर्जा संवर्धन क्षमतेचा अभ्यास, आणि डीएसएम कार्यक्रम, पोर्टफोलिओ आणि आराखडे कार्यान्वित करण्यासठी आवश्यक असलेल्या सर्व गरजांच्या संदर्भात डीएसएमच्या प्रशासन व व्यवस्थापनासाठी प्रस्तावित संस्थेबाबत चर्चा करावी.

१०. **निधीची गरज व निधी उभारणी**: येथे, कार्यक्रमाचे कार्यान्वयन, व्यवस्थापकीय खर्च, यासाठी एकूण आराखड्यासाठी लागणा-या निधीची वर्ष-निहाय गरज (बहु-वर्षीय आराखड्याच्या कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता) आणि निधी उभारणी योजना दाखवावी.

११. **डीएसएम आराखडा मूल्यांकन, संनियंत्रण व पडताळणी:** येथे डीएसएम आराखड्यासाठी मूल्यांकन, संनियंत्रण व पडताळणी आराखड्याचा तपशील द्यावा. येथे समाविष्ट करावयाच्या मूल्यांकन, संनियंत्रण व पडताळणी आराखड्याकरिता आयोगाचे मूल्यांकन, संनियंत्रण व पडताळणीचे विनियम मार्गदर्शक राहतील.

१२. **डीएसएम आराखडा संनियंत्रण व अहवाल:** येथे संनियंत्रण व अहवाल सादर करण्याच्या आराखड्याचा तपशील (वारंवारता, किमान मजकूर, प्रपत्र, निर्देश-फलक आणि पडताळणीसाठी निवडलेली साधने) द्यावा.

१३. **कार्यान्वयन आराखडा:** कार्यक्रम, पोर्टफोलिओ आणि आराखड्याचे वेगवेगळे भाग कार्यान्वित करावयाच्या वेळापत्रकाचा येथे तपशील द्यावा. हे वेळापत्रक कार्यांचा तक्ता सादर करण्यास अधीन राहून असेल.

## जोडपत्र ३: डीएसएम कार्यक्रमाच्या दस्तऐवजाचे पूरक भाग

कार्यक्रमाचा दस्तऐवज हे परवानाधारक तसेच सर्व हितसंबंधितांकरिता एक संदर्भ दस्तऐवज राहील. कार्यक्रम दस्तऐवजामध्ये निश्चित केलेल्या डीएसएम उपाययोजना ज्या ग्राहक विभागात कार्यान्वित करावायाच्या आहेत त्यांची माहिती असेल. कार्यक्रम दस्तऐवजामध्ये ग्राहक/विक्रेते यांच्या परस्पर-संबंधाकरिता प्रोत्साहने व वैशिष्ट्ये, पुरवठ्याचे पर्याय, संस्थात्मक संबंध, कार्यक्रम कार्यान्वित करण्याचा सविस्तर आराखडा कालम्मर्यादांसह व कार्यानवयनाच्या जबाबदा-या, याबाबत देखील माहिती असेल. कार्यक्रम दस्तऐवजामध्ये खालील सर्वसाधारण बाबींचा समावेश असणे आवश्यक राहीलः-

### १. कार्यक्रमाचा तपशील

ए) कार्यक्रमाद्वारे ज्या डीएसएम उपाय-योजना कार्यान्वित आणि तंत्रज्ञानांचा वापर करण्यात येणार आहे त्यांचा तपशील, तसेच डीएसएम कार्यक्रमात समाविष्ट करण्यासाठी पात्र असणाऱ्या ब्रँड आणि उत्पादकांची/विक्रेत्यांची यादी, संबंधित दर, दर्जाची हमी आणि उत्पादन बदलून देण्याबाबत/हमीबाबतचे धोरण, या बाबींचा तपशील असेल.

बी) कार्यक्रमाने लक्ष्यांकित केलेले ग्राहक विभाग व निश्चित केलेल्या ग्राहक विभागांतर्गत संभाव्य ग्राहक ठरविण्याकरिता वापरावयाचे पात्रतेचे निकष.

सी) अन्य हितचिंतक ( भांडवल पुरवठादार, ऊर्जा संवर्धन सेवा देणा-या संस्था, साधन-सामग्रीचे विक्रेते, सल्लागार, ऊर्जा लेखापरीक्षक, व्यापारी संघटना, व्यक्तींचे गट, अ-शासकीय संघटना, विद्या संस्था, शासकीय संस्था) जे कार्यान्वयन प्रक्रियेत समाविष्ट आहेत त्यांच्या भूमिका व जबाबदा-या आणि सहभागी होण्याची पध्दत.

डी) कार्यक्रमाद्वारे संबोधित करण्यात येत असलेल्या अडचणी.

ई) कार्यक्रमाद्वारे वापर करण्यासाठी प्रस्तावित व्यूह-रचना यासह प्रस्तावित सवलती, असल्यास, ग्राहक आणि अन्य हितसंबंधितांना कार्यक्रमात सहभागी होण्याकरिता उद्युक्त करण्यासाठी व्यूह-रचना, रकमा अदा करण्यासाठी व वसूल करण्याच्या पध्दतीचा तपशील आणि उपकरणे/उप-यंत्रे/सेवा देण्याची पध्दत.

एफ) कार्यक्रमाच्या व्यवस्थापन आणि कार्यान्वयन व्यवस्थांच्या तपशीलासह संस्थात्मक संबंधांचा आणि परवानाधारकांनी अनुसरावयाच्या अंतर्गत पडताळणी यंत्रणेचा (ट्रॅकिंग सिस्टीमचा) तपशील

२. **मूल्यांकन, मापन आणि पडताळणी, संनियंत्रण आणि अहवाल पाठविणे :** या भागात मूल्यांकन, मापन आणि पडताळणी, संनियंत्रण आणि अहवाल पाठविणे बाबतच्या आराखड्याचा तपशील देण्यात येईल.

ए) बेस लाईन परिगणनेचा तपशील आणि संनियंत्रण आणि पडताळणी पध्दतीचा तपशील

बी) डीएसएम कार्यक्रमांचे संनियंत्रण, आढावा आणि परिणाम (कार्यक्रमातील सहभागाच्या संदर्भात, कार्यक्षम उपकरणे आणि तंत्रज्ञानाच्या प्रसारातील वाढीच्या संदर्भात, आणि विद्युत भारातील कपात/वीज बचतीच्या संदर्भात) आणि विश्लेषणाची यंत्रणा/पध्दत - संनियंत्रण कोण करेल, संनियंत्रण कशाचे करेल, संनियंत्रण कशा रितीने करण्यात येईल, त्याची पडताळणी कोण करेल, संनियंत्रणाची वारंवारता किती राहील, संनियंत्रण/ प्रगती अहवाल कोण तयार करेल, इ.बाबत तपशील

३. **सविस्तर कार्यान्वयन आराखडा**

ए) या भागात कार्याक्रमांचे काही टप्पे ( म्हणजे, प्रात्यक्षिक/ पथदर्शक इ.) असल्यास त्यांचा तपशील देण्यात येईल.

बी) या भागात मुख्य कार्यांचा देखील तपशील असेल, तसेच त्यांचा अनुक्रम आणि परस्परावलंबन स्पष्ट करण्यात येईल. या भागात प्रत्येक मुख्य कार्यासाठी, कोण जबाबदार असेल आणि कार्य कधी करण्यात येईल याचा तपशील असेल.

४. **वार्षिक व संचित बचतीचा अंदाज**- बेस लाईन विचारात घेऊन, कार्यक्रमामुळे विजेत होणाऱ्या वार्षिक आणि संचित बचतीचा अंदाज व बचतीचा अंदाज करण्याच्या प्रक्रियेसाठी वापरण्यात आलेली गृहिते, याबाबत या भागात तपशील असेल.

५. **कार्यक्रमांसाठी लागणारा वार्षिक निधी**- या भागात निधी उभारण्यासाठी केलेल्या व्यवस्थेसह वितरण परवानाधारक, विक्रेते, ग्राहक, किरकोळ विक्रेते, राज्य शासन, केंद्र शासन, इ.चा हिस्सा, याचा तपशील असेल.

६. **खर्चातील परिणामकारकतेच्या परिगणनेच्या तपशीला**सह कार्यक्रमांचा खर्च आणि लाभ, ग्राहक वीज दरावरील परिणामासह विचारात घेतलेल्या सर्व घटकांच्या किंमती, आणि खर्चाच्या परिणामकारकतेच्या परिगणनेसाठी आणि घटकांच्या किंमतीसाठी वापरलेली सर्व गृहिते, यांचा तपशील.

७. **वाद निवारण यंत्रणा :** कार्यक्रम कार्यान्वित करण्याच्या स्तरांवर उद्‌भवणाऱ्या वादांचे निराकरण करण्यासाठी अनुसरावयाची योग्य पध्दत, कार्यक्रम ज्या पद्धतीने कार्यान्वित करण्यात येत असेल त्यामुळे वितरण परवानाधारकाकरिता उद्‌भवणाऱ्या प्रश्नांचे निराकरण, वितरण परवानाधारक कशा रितीने करेल, याबाबतचे एक विवरणपत्र या भागात असेल.

**(के. एन. खवारे)**
सचिव
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

ठिकाणः मुंबई

दिनांकः २६ एप्रिल २०१०